AIIB बँकेकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या घटक-“अ” व घटक-“आ” यासाठी प्राप्त झालेल्या कर्जाच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम रु.५६२.९०२४ कोटी महावितरण कंपनीस रोखीने वितरीत करणेबाबत.
(मागणी क्र.के-११, लेखाशीर्ष क्र.६८०१०७४५)

महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग
शासन निर्णय, क्रमांकः बियुडी-२०२६/प्र.क्र.१४६/ऊर्जा-७ (ई-क्र.१७६०५८०)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.सौरप्र-२०२०/प्र.क्र.२५९/ऊर्जा-७, दि.१५.०३.२०२४.
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.लेखाशीर्ष-२०२४/प्र.क्र.९५/ऊर्जा-७, दि. ०६.०६.२०२५.
३. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बीयुडी-२०२५/प्र.क्र.१३२/ऊर्जा-७, दि.२३.०३.२०२६.
४. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.संकिर्ण-२०२६/प्र.क्र.४४/अर्थ-३ दि.२०.०५.२०२६.
५. वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.५३(२)/PF-S/२०२६-३६०, दिनांक १३.०७.२०२६.
६. महावितरण यांचे पत्र क्र.क्र.मु.अ.विशेष प्रकल्प/२४०७१, दि.१५.०७.२०२६.
७. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.बीयुडी-२०२६/प्र.क्र.१२०/ऊर्जा-७, दि.१७.०७.२०२६.

प्रस्तावणा:-

शेतकऱ्यांना दिवसा विश्वासार्ह व अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी घटक "अ" अंतर्गत 'पारेषण विरहित सौर कृषी पंपांचे वितरण' ५ वर्षाच्या कालावधीत ५ लक्ष पंप महावितरण कंपनीद्वारे आस्थापित करण्यास (मागेल त्याला सौर कृषीपंप योजना) आणि घटक "आ" कृषी वितरण प्रणालीचे बळकटीकरण आणि क्षमता वाढ करणे व कृषी वितरण प्रणालीचे सौर ऊर्जीकरण महावितरण कंपनीद्वारे करण्यास शासन निर्णय दि.१५.०३.२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेसाठी आवश्यक असलेल्या एकूण रक्कमेच्या अंदाजे ६०% रक्कम "बाजार कर्ज" स्वरूपात एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बैंक (AIIB) द्वारे राज्य शासनाकडून प्रचलित बाजार दराने कर्ज घेऊन महावितरण कंपनीला उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त दोन्ही घटकांसाठी अनुक्रमे ३०% व ४०% हिस्सा राज्य अनुदान स्वरूपामध्ये अर्थसंकल्पीय नियतव्ययातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

संदर्भाधीन क्र. ७ येथील शासन निणर्यान्वये सन २०२६-२७ मध्ये महावितरण कंपनीने "मागेल त्याला सौर कृषी पंप" या योजनेतंर्गत सर्व वर्गवारीतील लाभार्थ्यासाठी माहे मे, २०२६ पर्यंत आस्थापित केलेल्या

एकूण ३,१७,१२२ सौर कृषीपंपांसाठी शासन हिस्स्यापोटी रु.७९३.७९ कोटी इतका निधी अर्थसंकल्पिय तरतूदीतून महावितरण कंपनीस वितरीत करण्यात आलेला आहे. महावितरण कंपनी, मुंबई यांच्या संदर्भाधीन क्र. ६ येथील दि.१५.०७.२०२६ रोजीच्या पत्रानुसार सदर योजनेंतर्गत सर्व वर्गवारीतील लाभार्थ्यांकरीता आस्थापित केलेल्या ३,१७,१२२ सौर कृषीपंपासाठी एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बैंक (AIIB) कर्ज हिस्सा स्वरूपात रु.४८८४.५३ कोटी इतका निधी आवश्यक आहे. सन २०२६-२७ करिता मागणी क्र.के-११, लेखाशीर्ष क्र.६८०१०७४५ खाली रु.४६८० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. संदर्भाधिन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये AIIB बँकेकडून कर्ज हिस्सा स्वरूपात प्राप्त झालेला पहिला हप्ता रु.१३६१.०२०८ कोटी इतका निधी महाहवितरण कंपनीस उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच, उपरोक्त घटक अ व घटक आ साठी संदर्भाधीन क्र. ५ येथील वित्त मंत्रालय, केंद्र शासन यांच्या दि.१३.०७.२०२६ रोजीच्या पत्रानुसार AIIB बँकेकडून कर्जाचा दुसरा हप्ता रू.५६२.९०२४ कोटी प्राप्त झाला आहे. सदर निधी रू. ५६२.९०२४ कोटी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., मुंबई यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शेतकऱ्यांना दिवसा विश्वासार्ह व अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी AIIB बँकेकडून कर्जाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या घटक "अ" अंतर्गत पारेषण विरहित सौर कृषी पंपांचे वितरण' ५ वर्षाच्या कालावधीत ५ लक्ष पंप महावितरण कंपनीद्वारे आस्थापित करणे (मागेल त्याला सौर कृषीपंप योजना) आणि घटक - "आ" कृषी वितरण प्रणालीचे बळकटीकरण आणि क्षमता वाढ करणे व कृषी वितरण प्रणालीचे सौर ऊर्जीकरण याकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात रु.४६८० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर तरतुदीमधून रु.५६२.९०२४ कोटी (अक्षरी रूपये पाचशे बासष्ट कोटी नव्वद लाख चोवीस हजार फक्त) इतका AIIB बँकेकडून प्राप्त झालेला कर्जाचा निधी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., मुंबई यांना वितरीत करण्यास याद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री. नारायण श्री. कराड, सह सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्रीम. अंकिता बोऱ्हाडे, कार्यासन अधिकारी, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सदर मंजूर झालेले कर्ज रक्कम रु.५६२.९०२४ कोटी (अक्षरी रूपये पाचशे बासष्ट कोटी नव्वद लाख चोवीस हजार फक्त) खाते क्र.६०३५५७५६२६१ येथून आहरित करुन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे नावे स्वतंत्ररित्या धनादेश काढून वितरित अथवा NEFT/RTGS Fund Transfer द्वारे निधी हस्तांतरित करण्याची कार्यवाही करावी.

३. या योजनेवरील खर्चाची उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत महावितरण कंपनीने शासनास सादर करावा. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला निधी केवळ या योजनेसाठीच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल, याची खातरजमा करण्यात यावी. मान्य व अनुज्ञेय काळात खर्च करण्याची जबाबदारी अध्यक्ष

व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांची राहील. याबाबतचा त्रैमासिक अहवाल सादर करण्याची जबाबदारी संचालक (अर्थ), महावितरण यांची राहील. सदर योजनेसाठीच्या कर्जाचा तपशिल परिशिष्ट अ मध्ये सोबत जोडला आहे.

४. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., यांनी आवश्यक तेव्हा महालेखापाल, मुंबई, महाराष्ट्र-१ यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

५. याबाबतचा खर्च "मागणी क्रमांक के-११, (०४) कृषि वाहिनींचे बळकटीकरण व सौर ऊर्जीकरण, (०४) (०१) कृषि वाहिनींचे बळकटीकरण व सौर ऊर्जीकरणासाठी ए.आय.आय.बी. बँकेकडून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला कर्ज (कार्यक्रम) (६८०१०७४५) ५५, कर्जे व आगाऊ रकमा " या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून भागविण्यात यावा. या लेखाशीर्षाखाली निधी वितरीत करण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या देयकाच्या अनुषंगाने प्रमाणित करण्यात येते की, सदर देयक सशर्त असून या लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही, तसेच, उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही.

६. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी महावितरण कंपनी यांना निधी वितरीत करताना शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४४/अर्थ-३,दिनांक २०.०५.२०२६ मधील आवश्यक त्या सूचना व अटींचे पालन करून व वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३१३/२०२६/व्यय-१६ वर दिनांक ०४.०८.२०२६ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०६१२२३५५९८५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAYANT SHARAD SAGADE

Digitally signed by JAYANT SHARAD SAGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=A6FD5F8313A5DBBC809E855BE10E149644DDC66D66F20F36D4D55BCFB56CEB55, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CAF6324C416282449C4078681A5B8972EB1D149920D77CC78A41448DF59C4C9, cn=JAYANT SHARAD SAGADE
Date: 2026.08.06 12:25:15 +05'30'

(जयंत सागडे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.सभापती/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
३. मा.उप सभापती/मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, मुंबई,
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक व औफाफ), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.मंत्री (अपारंपरिक ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

९. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई,
११. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,
१६. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
१७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१९. सचिव, मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग, मुंबई (पत्राने),
२०. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या.,मुंबई,
२१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
२२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
२३. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
२४. सह सचिव (ऊर्जा-७/३), ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२५. कक्ष अधिकारी (ऊर्जा-३), ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना ०३ मूळ प्रतींमध्ये पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,
२६. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२७. निवड नस्ती/ऊर्जा-७.

विवरण पत्र-अ

शासन निर्णय, क्रमांकः बियुडी-२०२६/प्र.क्र.१४६/ऊर्जा-७ दि.०६.०८.२०२६

अ.क्र.	तपशिल	माहिती
१.	ज्या संस्थेला कर्ज वित्तरीत करावयाचे आहे त्या संस्थेचे नाव (संपुर्ण पत्ता व पिन कोड सहीत.	महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं, मर्या. प्रकाशगड, प्लॉट जी-९, प्रा. अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा पूर्व.मुंबई-४०० ०५१
२.	वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक व दिनांक	प्रधान सचिव (व्यय) अनौपचारीक संदर्भ क्र. ३१३/२०२६/व्यय-१६ दि.०४.०८.२०२६
३.	कर्जाची एकूण मंजूर रक्कम	रु.६२११.८० कोटी
४.	मंजूर कर्जापैकी यापूर्वी कर्जाची रक्कम वितरित करण्यात आली असल्यास, वितरित करण्यात आलेली कर्जाची रक्कम, असल्यास कर्ज क्रमांक (Loan ID)	L0880A शा.नि.दि.२३.०३.२०२६ अन्वये रु.१३६१.०२०८ कोटी महावितरण कंपनीस वितरीत करण्यात आली आहे.
५.	मंजूर कर्जापैकी सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेली कर्जाची रक्कम	रु.५६२.९०२४ कोटी
६.	एकापेक्षा अनेक सहकारी संस्था, व्यक्ती यांना कर्ज मंजूर करण्यात आले असल्यास, त्यांची नावे नमुद, नावासमोर कर्ज मंजूरी रक्कम नमूद करण्यात यावी	निरंक
७.	एकूण कर्ज परत फेडीचे हप्ते	३१ हप्ते
८.	कर्ज परतफेडीच्या हप्त्याची रक्कम	प्राप्त कर्जाच्या रक्कमेप्रमाणे
९.	कर्ज परतफेडीच्या हप्त्याचा कालावधी, जसे वार्षिक/सहामाही/त्रैमासिक/मासिक इत्यादि	Half Yearly basis starting from 9 July 2029.
१०.	कर्ज परतफेडीसाठी सवलतीचा कालावधी (Moratorium Period)	३ Years
११.	कर्ज परतफेडीसाठी हप्त्याचा निश्चित केलेला कर्ज हप्त्याचा दिनांक	१ जुलै आणि १ जानेवारी
१२.	परतफेडीच्या पहिल्या हप्त्याचा दिनांक	१ जुलै, २०२९
१३.	कर्ज परतफेडीच्या शेवटच्या हप्त्याचा दिनांक	१ जुलै, २०४४
१४.	व्याज दर	SOFR + १.३५%
१५.	विलंब कालावधीसाठी दंडनिय व्याज दर व इतर आकार असल्यास	--
१६.	व्याजाचा परतफेडीच्या हप्त्याचा कालावधी जसे मासिक/वार्षिक/त्रैमासिक/सहामाही इत्यादी	Quarterly
१७.	व्याज ज्या दिनांकापासून देय होते तो दिनांक	०१.०१.२०२६
१८.	व्याजाबाबत इतर माहिती असल्यास	--

१९.	कर्ज वितरणाकरीता खर्चाचा लेखाशिर्ष	६८०१०७४५
२०.	कर्जाच्या वसूलीचे, जमेचे लेखाशिर्ष	६८०१५२१९०१
२१.	कर्जावरील व्याज/दंडनिय व्याज वसूलीचे, जमेचे लेखाशिर्ष	००४९५२९७०१
२२.	कर्जाशी संबधित असलेल्या कंपनीचे पदनाम, पत्ता व दूरध्वनी क्रमांक	अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. मर्या. प्रकाशगड, प्लॉट जी-९, प्रा. अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा पूर्व, मुंबई-४०० ०५१
२३.	कर्ज वसुली करणे / लेखे ठेवणे याबाबतची सोपविण्यात आलेल्या नोडल ऑफिसरचे पदनाम, पत्ता व दूरध्वनी क्रमांक	संचालक (वित्त), भ्रमणध्वनी क्र.९३२३७९८८०६ दुरध्वनी क्र. ०२२ ६९८५२६३९ महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. मर्या. ६ वा मजला, प्रकाशगड, प्लॉट जी-९, प्रा. अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा पूर्व, मुंबई-४०० ०५१
२४.	सदरचे कर्ज बाह्य सहाय्यित प्रकल्पातंर्गत (EAP) कर्ज घेऊन वितरीत करण्यात येत आहेत किंवा कसे, असल्यास ज्या आंतराष्ट्रिय संस्थेकडून कर्ज घेण्यात आलेल्या त्या संस्थेचे नाव	Yes, Asian Infrastructure Investment Bank (AIIB)
२५.	देशांतर्गत वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन कर्ज वितरीत करण्यात येत असल्याचे त्या संस्थेच नाव व पत्ता, जसे NCDC - नवी दिल्ली	Asian Infrastructure Investment Bank AIIB Headquarters, Tower A, Asia Financial Center No. १ Tianchen East Road, Chaoyang District Beijing, १००१०१ Peoples Republic of China.
२६.	आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक (DDO Code) जिल्हा कोषागाराचे नाव	अधिदान व लेखा कार्यालय आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक क्रमांक:- ७१०१०१४७०१
२७.	इतर	-----